महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

---

**क्र. पीआर-३/कृषी संजीवनी-२०१४/२८६३६** **दिनांक :१२/०९/२०१४**

# वाणिज्य परिपत्रक क्र. २२९

**विषय :- कृषी ग्राहकांकडील वीज बिल थकबाकीमध्ये सवलत देण्यासाठी "कृषी संजीवनी योजना-२०१४" ला मुदतवाढ देण्याबाबत.**

**संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१४८/ऊर्जा-५ दि.१९.६.२०१४.**
**२) वाणिज्य परिपत्रक क्र.२२३ दि.२०.०६.२०१४.**
**३) पत्र क्र. पीआर-३/कृषी संजीवनी-२०१४/२७१०३ दि.२८.०८.२०१४.**
**४) शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१४८/ऊर्जा-५ दि.११.९.२०१४.**

वरील संदर्भातील क्र. १ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र.२ च्या वाणिज्य परिपत्रकाद्वारे "कृषी संजीवनी योजना-२०१४" राबविण्यात येत आहे.

या योजने अंतर्गत प्रथम हप्ता किंवा ५०% मुळ थकबाकी एकरकमी भरण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंतच होती व त्याच बरोबर चालू वीज देयकांचा भरणा करणे क्रमप्राप्त होते.

त्या अनुषंगाने शासनाने "कृषी संजीवनी योजना-२०१४" ला दि.३१.१०.२०१४ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. सदर मुदतवाढीमुळे योजनेमध्ये पात्र होण्यासाठी कृषी ग्राहकांना दि.३१.०३.२०१४ च्या मुळ थकबाकी रक्कमेच्या ५०% रक्कम ३१.१०.२०१४ पर्यंत भरावी लागेल. तसेच १ एप्रिल २०१४ नंतर वितरीत करण्यात आलेल्या चालू वीज देयकांचा भरणा करणे क्रमप्राप्त आहे.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना विनंती आहे की, सदर मुदत वाढीबाबत जास्तीत जास्त कृषी ग्राहकांना अवगत करण्यात यावे. जेणेकरुन या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होईल.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे.